आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३ ऑगस्ट २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- हर घर तिरंगा अभियानात उत्साहाने भाग घ्यावा, असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन
- मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश
- राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १६३ तांत्रिक महाविद्यालयांमध्ये संविधान मंदिर उभारण्यात येणार
- सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून अधिक खटले निकाली

**आणि**

- राज्यात सर्वत्र पावसाचा जोर / पालघर पुणे आणि सातारा जिल्ह्यांना रेड अलर्ट

**<><><><><>**

जागतिक अन्न सुरक्षा आणि पोषण सुरक्षेबाबत तोडगा काढण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं ३२व्या आंतरराष्ट्रीय कृषी अर्थतज्ज्ञ परिषदेचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. सरकार कृषी क्षेत्रात विविध सुधारणा करत असून यामागे शेतकऱ्यांचं जीवनमान सुधारण्याचा हेतू आहे, सरकारच्या आर्थिक धोरणांच्या केंद्रस्थानी कृषिक्षेत्र आहे, असं ते म्हणाले. तृणधान्यं,

दूध, डाळी आणि मसाल्यांचं सर्वात जास्त उत्पादन भारतात होत असल्याचंही त्यांनी नमूद केलं. देशात रसायनमुक्त, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात शाश्वत शेतीवर मोठा भर देण्यात आल्याचंही प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. देशात कृषिक्षेत्रातलं संशोधन आणि शिक्षणासाठी चांगलं वातावरण असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यंदा या परिषदेत सुमारे ७५ देशांच्या एक हजारापेक्षा जास्त प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. यावर्षीची परिषदेची मध्यवर्ती संकल्पना ‘शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन’ अशी आहे.

**<><><><>**

देशवासियांनी हर घर तिरंगा अभियानात उत्साहाने भाग घ्यावा असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. येत्या ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान आपापल्या घरांवर तिरंगा फडकावून अभिमानाने स्वातंत्र्यदिन साजरा करावा असं त्यांनी आज समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्टमधे म्हटलं आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून एकता दर्शवणारं हे अभियान गेली दोन वर्षं राष्ट्रीय चळवळ बनल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. आपल्या घरावर फडकणाऱ्या तिरंगी झेंड्याबरोबरचं सेल्फी छायाचित्र काढून हरघरतिरंगा अभियानाच्या संकेतस्थळावर अपलोड करावं असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

**<><><><>**

मुंबई महानगरात पोलिसांना पुरेशा सदनिकांसाठी तातडीने प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासमवेत मुख्यमंत्र्यांची आज वर्षा निवासस्थानी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर उपाययोजना

करण्याचं आश्वासन दिलं. वरळी इथल्या पोलीस वसाहतीच्या समस्याही तत्काळ दूर करण्यासाठी आठ दिवसांच्या आत कार्यवाही करावी, अशी सूचना त्यांनी केली. बीडीडी चाळ पुनर्विकसित इमारतीत दुकानदारांना वाढीव जागा कशी देता येईल याबाबत नव्या इमारतींच्या आराखड्याचा विचार करून तसा प्रस्ताव तयार करावा, नव्या पुनर्विकसित इमारतींमध्ये ज्येष्ठ नागरिकांना प्राधान्य द्यावं असंही त्यांनी म्हाडाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सांगितलं. कल्याण ते शिळ रस्त्यावर पलावा समोरचा पूल आणि कल्याण इथला पत्री पुल या जोड रस्त्यांचं  कामही तातडीनं  हाती घ्यावं, असे निर्देश त्यांनी दिले.

<><><><>

पत्री सरकारचे जनक आणि महान स्वातंत्र्यसेनानी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या १२४ व्या जयंती निमित्त मुख्यमंत्र्यांनी  ठाण्यातल्या निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर इथं आज सकाळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमावर संदेशात त्यांना आदरांजली वाहिली.

मुंबई महानगरपालिकेत नाना पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आलं.

<><><><>

भाजपा हा संविधान आणि लोकशाही न मानणारा पक्ष असल्याची टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे केली आहे. ते आज नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. नागपुरात म्हाळगीनगर आणि मानेवाडा वळण रस्त्याच्या उड्डाण पुलाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाला काँग्रेसच्या स्थानिक आमदारांना निमंत्रण दिलं गेलं नसल्याचा दावा करत, हा कार्यक्रम भाजपाचा होता, की राज्य सरकारचा असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

सरकारी प्रकल्पांचे काम हे जनतेने दिलेल्या कराच्या पैशांतून होते, त्यामुळेच अशा प्रकल्पांशी संबंधित कार्यक्रमात तिथल्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना आमंत्रण दिले जाते मात्र भाजपा हा नियम पाळत नाही अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

पुणे-सातारा महामार्गच्या दुरुस्तीची मागणी तसंच पुणे- बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेविरोधात काँग्रेस पक्षानं पुणे ते कोल्हापूर दरम्यान विविध ठिकाणी टोलनाक्यावर टोलबंद आंदोलन केलं. रस्ते खराब असूनही टोल वसूल केला जात असल्याचं म्हणत टोलनाके बंद करायची मागणी आंदोलनकांनी केली. खेड - शिवापूर टोलनाक्यावर जाणाऱ्या वाहनांना टोल शिवाय जाऊ देत आंदोलकांनी टोल वसुलीचा निषेध केला. हे टोलनाका बंद होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवायचा इशाराही काँग्रेसनं दिला आहे.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांना राज्य घटनेचं महत्व पटवून देण्यासाठी राज्यातल्या ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १६३ तांत्रिक महाविद्यालयांमध्ये संविधान मंदिर उभारलं जाणार आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं येत्या १५ ऑगस्ट रोजी एकत्रितपणे या संविधान मंदिरांचं उद्घाटन ऑनलाइन होणार असल्याची माहिती मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ इथं आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

भारतीय संविधानातून सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळते. विद्यार्थ्यांच्या विचारांना आकार देणाऱ्या या मंदिरांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीचं पूजन होईल असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं आयोजित केलेल्या लोक अदालतीमध्ये एक हजारहून

अधिक खटले निकाली निघाले आहेत. याअंतर्गत दिवाणी, भूसंपादन आणि विवाहविषयक अनेक खटले मार्गी लागले अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली. सर्वोच्च न्यायालयाचं ७५ वं स्थापना वर्ष साजरं करण्यासाठी न्यायालयानं हाती घेतलेल्या विशेष लोक अदालत उपक्रमाचा आज अखेरचा दिवस आहे.

**<><><><><>**

पश्चिम घाट क्षेत्राअंतर्गत येत असलेल्या महाराष्ट्रासह सहा राज्यांमधल्या ५६ हजार ८०० चौरस किलोमीटर पेक्षा जास्त परिसराला 'पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र' म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नवीन मसुदा अधिसूचना जारी केली आहे. महाराष्ट्रासह गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू या सहा राज्यांचा यात समावेश आहे. या संदर्भात सरकारनं जनतेकडून येत्या ६० दिवसांमध्ये सूचना आणि हरकती मागवल्या असून नागरिक esz-mef@nic.in या संकेत स्थळावर त्याची नोंद करू शकतात.

सहा राज्यातला हा परिसर पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित झाल्यानंतर या भागात उत्खनन, खाणकाम आणि मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांचा विकास, आदी कामांवर बंधनं येतील, असं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात हिवताप आणि डेंग्यूचं प्रमाण रोखण्याच्या उद्देशानं आरोग्य विभागानं नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्षेत्रात राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण विशेष शिबीर आयोजित केलं होतं.

<><><><><><><><><><><>

नांदेड जिल्ह्यातल्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या वतीनं आज सकाळी ‘अवयवदान जनजागृती रॅली’ काढण्यात आली. त्यात आरोग्य विभागातले डॉक्टर्स, अधिकारी, कर्मचारी तसंच जिल्ह्यातल्या विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते, अशी माहिती आमच्या बातमीदारानं दिली आहे.

<><><><><>

राज्यात आज दमदार पाऊस पडला. **मुंबईत** गेल्या काही दिवसांच्या विश्रांतीनंतर आज पावसानं हजेरी लावली. सकाळपासून शहर आणि उपनगरात मध्यम स्वरुपात सुरू झालेल्या पावसाचा जोर दुपारनंतर वाढला. माटुंगा, दादर, अंधेरी सब वे भागात पाणी साचलं होतं. धरण क्षेत्रांतही दमदार पाऊस झाला. मध्य वैतरणा, मोडकसागर धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे.

**पुण्यात** घाटमाथा प्रदेशात जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग काल संध्याकाळापासून क्रमाक्रमाने वाढवण्यात आला आहे. मुळशी धरणातून मुळा नदीपात्रात सुरू असलेला विसर्गही आज दुपारपासून वाढवण्यात आला. या पार्श्वभूमीवर

नदीकाठच्या नागरिकांनी दक्षता घेण्याचं आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे. पानशेत, वरस गाव आणि टेमघर ही धरणं ९० टक्क्यांपेक्षा जास्त भरली आहेत.

**सांगली** जिल्ह्यातल्या कोयना धरणातून ५२ हजार १०० क्युसेक्स, वारणा धरणातून ११ हजार ५७५ क्युसेक्स तर अलमट्टी धरणातून ३ लाख क्युसेक्स विसर्ग सुरू असल्याचं जलसंपदा विभागानं कळवलं आहे. पाऊस आणि धरणातून विसर्ग यामुळे कृष्णा नदीची पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. सर्व यंत्रणा सतर्क असून नागरिकांनाही सतर्क राहण्याचं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

गेल्या २४ तासांत **मध्य महाराष्ट्रा**त काही ठिकाणी जोरदार तर तुरळक ठिकाणी खूप जोरदार पाऊस पडला. **कोकण** तसंच **विदर्भात** बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर **मराठवाड्यात** काही ठिकाणी पाऊस पडला.

इगतपुरी घाटातल्या पावसामुळं कसारा आणि इगतपुरी रेल्वे स्थानकादरम्यान रुळांवर दरड कोसळल्यानं तीनपैकी एका अप मार्गावरची वाहतूक विस्कळीत झाली होती.

दरम्यान, मुंबई गोवा महामार्गाला जोडला गेलेल्या कोलाड रोहा राज्य मार्गाला शुक्रवारी दिवसभर कोसळणाऱ्या पावसामुळे पाले खुर्द आणि अशोक नगर या दरम्यान मोठं भगदाड पडल्यानं वाहतूक विस्कळीत झाली होती.

**<><><><><>**

येत्या २४ तासांत पालघर, पुणे, सातारा जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि नाशिक जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रासह विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची

शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे तर किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मध्य महाराष्ट्रात घाट भागात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.